MHAU090001962025

## प्रतिदाव्यातील जैसे थे तैसे स्थितीवर आदेश पारित

प्रतिदाव्यातील वादी (मुळ प्रतिवादी क्र.१) यांनी प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१३ यांनी दावा मिळकत कोणासही विक्री करु नये व त्या दावा मिळकतीतील अर्ध्या रिकाम्या प्लॉटवर बांधकाम करु नये यासाठी दिलेला आहे. प्रस्तुतचा अर्ज वाचला त्यावर प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे दाखल केलेले नाही. प्रतिदाव्यातील वादी (मुळ प्रतिवादी क्र.१) यांच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावर दाखल असलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. अभिलेखावर दाखल असलेल्या कागदपत्रावरुन दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी यांना पुर्नवसन म्हणून मिळालेली असल्याचे दिसून येते. दावा मिळकत ही प्रतिदाव्यातील वादी (मुळ प्रतिवादी क्र.१) व प्रतिवादींची सामाईक एकत्र कुटुंबाची वडिलोपार्जित मिळकत असल्याचे दिसून येते. प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र.१ भाऊसाहेब याने प्रतिदाव्यातील दावा मिळकत ही प्रतिवादी क्र.१३ याला विक्री केली. त्यामध्ये वादींचा हिस्सा आहे. त्यामुळे जर प्रतिवादी क्र.१३ ने दावा मिळकत त्रयस्थ इसमास विक्री केली तर प्रतिदाव्यातील वादींच्या हक्कावर गदा येणार आहे. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

**०१.** प्रतिवादी क्र.१३ यांना आदेशित करण्यात येते की, त्यांनी दावा मिळकत कोणासही विक्री करु नये व त्या दावा मिळकतीतील अर्ध्या रिकाम्या प्लॉटवर बांधकाम करु नये व दावा मिळकतीची जैसे थे तैसे स्थिति कायम ठेवावी.

RASHMI KALPESH BAPHANA
Digitally signed by RASHMI KALPESH BAPHANA
Date: 2026.05.08 16:49:00 +0530

**दिनांकः०८/०५/२०२६** **(श्रीमती.आर.के.बाफना/भळगट )**

३रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर पैठण,

जि.औरंगाबाद.

## प्रमाणपत्र

...........   मी अधिकथन करतो की, या पी.डी.एफ्. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द–नि–शब्द हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : के.व्ही.बायस [लघुलेखक नि.श्रे.] |
| न्यायालयाचे नाव | : ३रे सह दि. न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग, पैठण |
| न्यायनिर्णयाची तारीख | : ०८.०५.२०२६ |
| न्यायनिर्णयावर पीठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : ०८.०५.२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | : ०८.०५.२०२६ |